ePaper
बुलढाण्यात बस खांबाला धडकून पलटी अन् अग्नितांडव, 25 प्रवाशांचा मृत्यू



वर्ष - 7 । अंक - 62 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**
- जुलैमध्ये सरासरीइतका पाऊस!
- 'इंद्रायणी थडी'साठी स्टॉलवाटप अंतिम टप्प्यात
- काँग्रेसचा तांबेंना झटका!

www.mahaenews.com | शनिवार, दि.1 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उपयोगकर्ता शुल्क : 2019 पासुनची वसुली रद्द; एप्रिल 2023 पासून होणार लागू!

## » महापालिका प्रशासनाचा नगर विकास विभागाला प्रस्ताव

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील मिळकतधारकांवर लादलेल्या उपयोगकर्ता शुल्काच्या दंडातून (शास्ती) सुटका होणार आहे. महापालिका प्रशासनाने २०१९ पासून ऐवजी एप्रिल- २०२३ पासून करवसुलीची अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळावी, असा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना काहीअंशी दिलासा मिळणार आहे..**

उपयोगकर्ता शुल्क आणि दंडाची रक्कम माफ करावी. या मागणीसाठी भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे मागणी केली होती. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी महापालिका भवन



येथे बैठक आयोजित केली होती. यावेळी आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, जितेंद्र वाघ, चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह फेडरेशनचे पदाधिकारी, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत घनकचऱ्याची हाताळणी व व्यवस्थापन करण्यासाठी शहरातील सर्व मालमत्तांकडून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी सुरू केली आहे. सर्वसामान्य मिळकतधारक आणि लोकप्रतिनिधींचा या कर आकारणीला विरोध आहे. उपभोगकर्ता शुल्क आकारणीबाबत राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने दि. १ जुलै २०१९ रोजी अधिसूचना जाहीर केली होती. मात्र, गेल्या चार वर्षात याबाबत प्रशासनाने अंमलबजावणी केली नाही. प्रशासकीय दप्तरदिरंगाईमुळे हा कर वसुली प्रलंबित राहीला आहे. याला सर्वसामान्य नागरिकांना जबाबदार धरणे अन्यायकारक आहे. शहरातील प्रति मालमत्ता ६० रुपये प्रतिमहा अशा प्रमाणे वार्षिक ७२० रुपये अशी दि. १ जुलै २०१९ पासून 'उपयोगकर्ता शुल्क व शास्ती' वसुली सुरू केली आहे, याला शहरातील नागरिकांचा विरोध आहे, ही बाब प्रशासनाने लक्षात घेतली पाहिजे, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली.

राज्य सरकारने याबाबत दुसरी अधिसूचना दि. १ जुलै २०१९ रोजी काढली. त्यानुसार, प्रशासन गेल्या चार वर्षांचा एकत्रित दोन टप्प्यांमध्ये कर वसूल करीत आहे. सामान्य नागरिकांना यामुळे नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गेल्या चार वर्षांच्या शास्तीसह उपयोगकर्ता शुल्काची वसुली व्यवहार्य नाही. त्यामुळे व्यापक जनहिताच्या दृष्टीने चार वर्षांचा कराची 'शास्ती' रद्द करुन एप्रिल- २०२३ पासून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी करावी, अशी सूचना केली. यावर आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून, एप्रिल- २०२३ पासून कर आकारणी करण्याबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. विशेष म्हणजे, 'झिरो वेस्ट' धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या सोसायटीधारकांकडून उपयोगकर्ता शुल्काची आकारणी करण्यात येणार नाही. तसेच, पर्यावरणपूरक सोसायटींना मिळकतकरामध्ये सवलत देण्याकामी सवलत धोरणाच्या कक्षा विस्तारण्याची मागणी सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली.

### » आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला मिळाले अंशत: यश

"महापालिका प्रशासनाने २०१९ पासूनचा दंड रद्द करावा. २०१९ ते २०२३ पर्यंत वसुल केलेली दंडाची रक्कम समायोजित करावी. तसेच, झिरो वेस्टसह पर्यावरण पूरक सोसायटींसाठी मिळकत कर सवलत योजनेच्या कक्षा विस्ताराव्यात आदी मागण्या प्रशासनाने मान्य केल्या आहेत. तसा प्रस्ताव राज्य शासनाला पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे आमच्या मागणीला काही अंशी यश मिळाले आहे. तरीही उपयोगकर्ता शुल्क रद्द करण्याच्या भूमिकेवर आम्ही ठाम आहोत.
– **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# वारकऱ्यांची सेवा करणाऱ्या डॉक्टरांचा सन्मान

## » चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट व लोकनेते लक्ष्मण पांडुरंग जगताप मित्र परिवार यांच्या वतीने उपक्रम

।पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट व लोकनेते लक्ष्मण पांडुरंग जगताप मित्र परिवार यांच्या वतीने दरवर्षी दिंडीतील वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविली जाते. तशीच मोफत आरोग्यसेवा याही वर्षी पुरवण्यात आली. यात वारकऱ्यांना मोफत तपासणी व औषधोपचार देहू आळंदी ते पंढरपूर या संपूर्ण पालखी महामार्गावर पुरविण्यात आले. यात दररोज हजारो वारकऱ्यांनी याचा लाभ घेतला. या वारीत वारकऱ्यांची सेवा करणाऱ्या डॉक्टरांचा चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सन्मान करण्यात आला.

यात आपल्या सेवेचे योगदान देणारे डॉ. संतोष कदम, डॉ. ऋषी महाजन, डॉ. देविदास शेलार, डॉ. प्रियांका बाजड तसेच चंद्ररंग पॅरामेडिकलचे विद्यार्थी व सर्व सेवकांचा सत्कार 'चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट' व लोकनेते



लक्ष्मण पांडुरंग जगताप मित्र परिवार यांच्या वतीने श्री साई सेवा कुंज आश्रम, कासारवाडी येथे आषाढी एकादशी निमित्ताने करण्यात आलापंढरपूरला जाऊन विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेणे पुरेसे नसते.

### वारकऱ्यांचे आरोग्य जपण्यासाठी उपक्रम

» महाराष्ट्राला वारीचे जे आकर्षण वाटते, ते विशेषत: संतांच्या पालख्यांमुळे. पूर्वीच्या काळी एखाद्याला पालखीपदस्थ करणे, हा सर्वांत मोठा सन्मान होता. आता तर लाखो वारकरी आणि त्यांचे कुटुंबीय यात सहभागी होतात. अगदी परराज्यातून, परदेशातून देखील उत्सुकतेपोटी अनेक जण वारीच्या प्रवासात येतात. या सर्वांचीच कुठल्याही प्रकारची आरोग्य समस्या येऊन गैरसोय होणार नाही याची काळजी लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवार आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने सर्व डॉक्टर आणि आरोग्य सेवक त्यांच्या परीने घेत होते. पांडुरंगाच्या वारकऱ्यांचे आरोग्य जपण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन लोकनेते आमदार लक्ष्मण जगताप यांच्या संकल्पनेतून करत असलयाचे ट्रस्टचे अध्यक्ष शंकर जगताप बंधू विजय जगताप यांनी सांगितले.

# जुलैमध्ये सरासरीइतका पाऊस!

## » 7 जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याचा हवामान विभागाचा अंदाज

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशात जुलै महिन्यात सरासरीएवढा मोसमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यास ७ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने शुक्रवारी वर्तवला."यंदा देशात मोसमी पाऊस उशिराने दाखल झाला.**



मोसमी वाऱ्यात फारसा जोर नव्हता. पण, बिपरजॉय चक्रीवादळीमुळे मोसमी वारे वेगाने देशभरात पोहोचले. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी, दक्षिण भारत, ईशान्य भारतात जूनच्या शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस झाला आहे.

तरीही किनारपट्टीवर पडलेला पाऊस जून महिन्याच्या सरासरीपेक्षा कमीच आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाचा जोर दोन दिवसांत कमी होईल. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन पावसाला पोषक स्थिती तयार होईल. साधारण ७ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची अपेक्षा आहे, असे भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले.

### पाच दिवस मुसळधारांचा अंदाज

**» महाराष्ट्रापासून केरळ किनारपट्टीपर्यंत तयार झालेला कमी दाबाचा पट्टा कायम आहे. त्यामुळे पुढील तीन दिवस कोकण आणि गोव्याला 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस किनारपट्टीवरील अन्य जिल्ह्यांत मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. घाटमाथा, मध्य महाराष्ट्रातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाड्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.**

# पुणे महापालिकेचे विभाजन करून 'हडपसर-वाघोली' स्वतंत्र पालिका करा!

## » काँग्रेस पदाधिकाऱ्यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्याच्या चांदणी चौकातील वाहतूक ही काही काळासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत नागरिकांनी पर्यायी सेवा रस्त्याचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे.**




पुणे शहरात दोन महानगरपालिका अस्तित्वात आहेत. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अशा दोन महानगर पालिकांचा पुणे शहरात समावेश होतो. मात्र, पुणे महानगरपालिकेचा भाग असलेला हडपसर भागाची स्वतंत्र महानगरपालिका करा अशी मागणी कायम होत असते. आता अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाचे राज्य सचिव संजय बालगुडे तसेच काँग्रेसचे पुण्यातील पदाधिकारी नरेंद्र व्यवहारे आणि ऋषिकेश बालगुडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहीत, हडपसर-वाघोली भागाची स्वतंत्र महानगरपालिका करा, अशी मागणी केली आहे. पुणे महानगरपालिकेचे विभाजन करून हडपसर-वाघोली भागाचे नवी महापालिका करण्याची मागणी करणारे पत्र त्यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिले आहे.

संजय बालगुडे आपल्या पत्रात म्हणतात, "पुणे महानगरपालिकेचे क्षेत्रफळ 1997 साली 143 स्क्वेअर किलोमीटर होती. सन 1997 साली महापालिकेत 23 गावांचा समावेश झाला. 2002 साली त्या ठिकाणी निवडणुका झाल्या. तरी आजही या गावांचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास झालेला नाही. येथील पाणी कचरा व बेकायदा इमारतींचा प्रश्न तसाच आहे. सन 2015 आम्ही पुणे महानगरपालिकेचे विभाजन करून आजूबाजूची गावे सामाविष्ट करून क दर्जाची महापालिका करा, अशी मागणी पुणे मनपा ठरावाद्वारे सरकारकडे केली होती.

बालगुडे पुढे म्हणाले, "त्यावेळेस पुण्याच्या बाजूची गावे पुणे मनपा मध्ये सामाविष्ट करण्याचा विचार सरकार दरबारी चालू होता. सदर गावे सामाविष्ट करायची असतील तर महापालिकेस विकासासाठी २५००० हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. तो खर्च सरकारने करावा, अशी आम्ही मागणी केली होती. सन 2017 मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये ११ गावांचा समावेश करण्यात आला. त्यावेळेस आम्ही उपोषण करून त्यास विरोध केला होता. त्याचे कारण गावे समाविष्ट झाली तर प्रशासकीय व्यवस्था तेथील मूलभूत प्रश्न आर्थिक तरतूद व मनुष्यबळ या सर्व बाबी अनेक वर्ष प्रलंबित राहतात."

"सन 2021 मध्ये आणखी 23 गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात आली. पुणे महानगरपालिकेत आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका जवळजवळ 480 स्क्वेअर किलोमीटर एवढी हद्द झाली. परंतु मनपाच्या उत्पादनात वाढ त्या प्रमाणात होत नाही. सर्वच बाबींना मनुष्यबळ अपुरे पडते. या सर्वबाबींचा पुणेकर नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो. गावातून महापालिकेत यायला नागरिकांना अथवा वार्ड ऑफिस मध्ये तक्रार देण्यासाठी साधारणता दीड ते दोन तास प्रवास करावा लागतो. तसेच मूळच्या पुणे शहरात याचा प्रचंड ताण आलेला आहे, पुणे शहर हे बकाल होत चालले आहे. त्यामुळे पुण्यातील वाहतूक व्यवस्था सुद्धा ओलमडली आहे. सामान्य नागरिक या सर्व बाबींमुळे त्रासून गेला आहे," असेही बालगुडे म्हणाले. "मुंबई महापालिकेच्या गेल्या 30 ते 35 वर्षात सहा नव्या महापालिका निर्माण झाल्या."

# तोडफोडीकडे दुर्लक्ष पोलिसांना पडलं महागात; वरिष्ठ निरीक्षकासह पाच जण निलंबित



। पुणे । महाईन्यूज ।

तळजाई आणि सहकारनगर भागात वाहनांची तोडफोड झाल्याच्या घटनांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवून सहकारनगर पोलिस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलिस निरीक्षक; तसेच पोलिस निरीक्षक आणि पाच कर्मचाऱ्यांना पोलिस आयुक्त रितेशकुमार यांनी गुरुवारी निलंबित केले. या महिन्यात घडलेल्या वाहन तोडफोडीच्या घटनांची तक्रार गांभीर्याने न घेणे या पोलिसांना महागात पडले आहे.

सहकारनगर पोलिस ठाण्याचे तत्कालीन निरीक्षक (सध्या नेमणूक नियंत्रण कक्ष) सावळाराम साळगावकर, पोलिस निरीक्षक मनोज शेंडगे, सहायक पोलिस निरीक्षक समीर शेंडे, पोलिस उपनिरीक्षक हसन मुलाणी, मारुती वाघमारे, हवालदार संदीप पोटकुले आणि विनायक जांभळे अशी निलंबित करण्यात आलेल्या पोलिसांची नावे आहेत. कर्तव्य गांभीर्याने आणि जबाबदारीने पार पडले नसल्याने शासकीय सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे.

अरण्येश्वर भागात टोळक्याने दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री दहा ते पंधरा वाहनांची तोडफोड करून दहशत निर्माण केली होती. तोडफोड करणाऱ्या गुंडांनी घरांवर दगडफेक केल्याने घबराट उडाली होती. गेल्या आठवड्यात तळजाई पठार परिसरात सराईत गुंड आणि साथीदारांनी २६ वाहनांची तोडफोड केली होती. टोळक्याने सहकारनगर भागात भररस्त्यात तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा केल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान साळगावकर यांची पोलिस नियंत्रण कक्षात दोन दिवसांपूर्वी बदली करण्यात आली होती.

# चिखली-तळवडे परिसराच्या ‘कनेक्टिव्हीटी’ला मिळणार चालना!

## आ. महेश लांडगे यांच्या प्रशासनाला सूचना; आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**टाळगाव चिखली आणि तळवडे परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे तातडीने हाती घ्यावीत. मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते सुसज्ज करुन वाहतूक सक्षम करावी, अशी सूचना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. त्यामुळे चिखली व तळवडे परिसराच्या ‘कनेक्टिव्हीटी’ला चालना मिळणार आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. यावेळी समाविष्ट गावांतील विकासकामांबाबत विविध मुद्यांवर चर्चाही करण्यात आली.





आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ साली टाळगाव चिखली आणि तळवडे गावचा समावेश झाला आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, चिखली-मोशी-चऱ्होली असा सर्वात मोठा ‘रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’ विकसित होत आहे. चिखली गावाला ऐतिहासिक वारसा आहे. राज्यातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना अध्यात्म आणि वारकरी सांप्रदायाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ टाळगाव चिखली येथे सुरू झाले आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यातून या ठिकाणी अध्यात्म आणि वारकरी सांप्रदयातील व्यक्ती चिखलीला भेट देतात. तळवडेत आयटी पार्क आणि औद्योगिक पट्टा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी असते. श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारा रस्ता चिखलीतून जातो. चाकण औद्योगिक पट्यातून ये-जा करणारे कामगार, कष्टकरी, तळवडे एकआयडी, जाधववाडी भागातील व्यावसिक पट्टा या भागातून मोठ्या प्रमाणात चिखलीतून रहदारी होत असते. मात्र, गेल्या अडीच-तीन वर्षांत चिखली आणि परिसरातील अंतर्गत रस्त्यांची कामे ज्या गतीने होणे अपेक्षीत आहे, तसे झालेले दिसत नाही. २०१४ ते २०१९ दरम्यान काही रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात अनेक रस्त्यांची कामे रखडली आहेत.

### ... या रस्त्यांच्या कामाला प्राधान्य देणार!

१) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपिठकडे जाणारा 18 मीटर रुंद डीपी रस्ता व इतर डीपी रस्ते विकसित करणे. २) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील साने चौक ते चिखली चौक रस्ता मंजूर विकास आराखड्यानुसार विकसित करणे. ३) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील देहू आळंदी ते सोनवणे वस्ती कडे जाणारा ३० मीटर रुंद डीपी रस्ता विकसित करणे. ४) स्पाइन सिटी चिखली ते पुणे नाशिक रोड, ५) प्रभाग क्रमांक 12 मधील त्रिवेणी नगर चौक ते तळवडे चौकापर्यंत 24 मीटर रस्ता विकसित करणे. ६) प्रभाग क्रमांक 12 मधील कॅनबे चौक ते भक्ती शक्ती चौकापर्यंत देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतून जाणारा नोन डीपी रस्ता विकसित करणे. ७) प्रभाग क्रमांक 12 मधील नदीच्या कडेने जाणारा मंजूर विकास योजनेतील रस्ता विकसित करणे १२ मीटर रुंद, ८) प्रभाग क्रमांक 12 मधील कॅनबे चौक ते स्पाइन रस्त्याला जोडणारा 18 मीटर रुंद डीपी रस्ता विकसित करणे. ९) तळवडे ते चऱ्होली नदीपात्रातील रस्ता विकसित करणे, १०) मौजे तळवडे येथील त्रिवेणी नगर येथील 75 मीटर स्पाइन रस्ता विकसित करणे आदी रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

“ चिखली आणि तळवडे परिसरातील मुख्य रस्त्यांना पर्यायी रस्ते विकसित करुन शहराच्या मुख्य रस्त्यांना जोडल्यास ‘कनेक्टिव्हीटी’ वाढणार आहे. वाहतूक कोंडी कमी होईल आणि वाहनचालक- नागरिकांचा वेळ आणि इंधनाची बचत होईल. त्यामुळे महापालिका विकास आराखड्यानुसार (DP) रस्त्यांच्या विकासाची कामे हाती घेण्यात यावी. त्यामुळे नव्याने वास्तव्यास आलेल्या नागरिकांना पायाभूत सुविधा मिळतील, अशी अपेक्षा आहे.

– **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड

---

# भामा-आसखेड जलवाहिनीचे काम वेगात!

## जागा देण्यास विरोध झाल्यास पोलीस बंदोबस्तात घेतला जाणार ताबा

। पिंपरी । महाईन्यूज ।

**भामा-आसखेड धरणातून थेट जलवाहिनीव्दारे पाणी आणण्याच्या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर गती देण्यात आली असून आतापर्यंत वरिष्ठ स्तरावर तीन बैठका झाल्या आहेत. भामा-आसखेड धरणातून थेट जलवाहिनीव्दारे पाणी आणण्याच्या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर गती देण्यात आली असून आतापर्यंत वरिष्ठ स्तरावर तीन बैठका झाल्या आहेत**



» भामा-आसखेड धरणातून थेट जलवाहिनीव्दारे पाणी आणण्याच्या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर गती

» आतापर्यंत वरिष्ठ स्तरावर तीन बैठका पार पडल्या

जलवाहिनीचे काम आवश्यक असेल तेथे पोलीस बंदोबस्तात सुरू असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले. भामा-आसखेड धरणातून थेट जलवाहिनीव्दारे १६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी आणले जाणार आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने ज्या ठिकाणी जागा ताब्यात मिळाली आहे त्या ठिकाणी जलवाहिनीचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलवाहिनीसाठी पालिकेला तात्काळ जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एका समितीची नेमणूक केली आहे. तसेच तीन बैठकादेखील झाल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वन विभाग, जलसंपदा विभागाच्या जागेतून जलवाहिनी टाकण्यात येत आहे. सध्या जलवाहिनीचे वेगाने आणि आवश्यक असेल तेथे पोलीस बंदोबस्तात कामकाज सुरू आहे. काही ठिकाणी जलवाहिनीसाठी आवश्यक असलेली उर्वरित जागाही दोन महिन्यांच्या आत पालिकेच्या ताब्यात येईल, असेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.




# समानतेच्या स्वप्नाकडे



**भारतात प्रत्येक नागरिकासाठी समान नागरी कायदा असावा, असे प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताचे एक स्वप्नच अधोरेखित केले. घटना समितीच्या बैठकांमध्ये बाबासाहेबांनी समान नागरी कायद्याचा मुद्दा वारंवार मांडला. पंडित नेहरू हेही आरंभी समान नागरी कायद्याचे कट्टर समर्थक होते. मात्र, काँग्रेसमधील पुराणमतवादी गटापुढे त्यांना झुकावे लागले. पंडितजींच्या या कचखाऊ भूमिकेवरही डॉ. आंबेडकरांनी आसूड ओढले.**

डॉ. आंबेडकरांनी पहिल्या मंत्रिमंडळाचा राजीनामा देण्यामागे ‘हिंदू कोड बिला’चे पडलेले चार तुकडे आणि समान नागरी कायद्याचे भंगलेले स्वप्न हे महत्त्वाचे कारण होते. तेव्हा स्वतंत्र नवभारत साकारत असताना समान नागरी कायदा केवळ राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये जाऊन बसला. या तत्त्वांना ना काळाचे बंधन होते; ना कायद्याचे. त्यामुळे, अजूनही समान नागरी कायदा तेथेच बसून आहे. पंतप्रधान मोदी भोपाळमध्ये म्हणाले त्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने हा प्रश्न वारंवार उपस्थित केला. सर्व केंद्र सरकारांकडे यासंबंधी विचारणा केली. जानेवारी, २०२२ मध्ये याचिकांची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सरकारला उद्देशून ‘आम्ही तुम्हाला ही शेवटची संधी देत आहोत,’ अशी कडक भाषा वापरली. सुप्रीम कोर्टाने छडीचा प्रसाद देऊनही हा कायदा का होत नाही, असा सवाल मोदींनी केला; त्याला हा संदर्भ होता. सर्वोच्च न्यायालयाने इशारा दिल्यानंतर सरकारने गेल्या वर्षी प्रतिज्ञापत्र सादर केले आणि सरकार समान नागरी कायदा करण्यास तयार आहे, असे त्यात नमूद केले. त्यानंतर, बाविसाव्या कायदा आयोगाने आपले काम सुरू केले. देशभरातील नागरिकांच्या सूचना आणि हरकती मागविणे, हा त्याच कामाचा एक भाग होता.

मोदी यांच्या वक्तव्यामुळे समान नागरी कायद्याची लांबलेली प्रक्रिया एका तार्किक टप्प्यापर्यंत आली आहे. ही अत्यंत स्वागतार्ह बाब आहे. या विषयाकडे जात, पात, धर्म, प्रांत, वंश, रुढी, चालीरीती किंवा कोणतीही अस्मिता यांच्या नजरेतून पाहणे म्हणजे भारताचा आधुनिक राष्ट्र बनण्याचा प्रवास अवरुद्ध करणे. हिंदू कोड बिलाला विरोध करणारे धर्ममार्तंड स्वातंत्र्यानंतर जी घोडचूक करीत होते; तीच घोडचूक आज ‘मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड’ आणि इतर धर्मांध मुस्लिम नेते करीत आहेत. या कायद्याला हे बोर्ड जितका विरोध करील; तितके धार्मिक ध्रुवीकरण वाढेल आणि शेवटी ते दोन्हीकडच्या जातीय शक्तींच्या पथ्यावर पडेल. ऑल इंडिया मजलिस-इ-इत्तेहदुल मुसलमीन म्हणजे एमआयएमचे नेते खा. असदुद्दीने ओवैसी या कायद्यामुळे भारतातील विविधतेला धक्का लागेल, असे तारे तोडत आहेत. भारतीय संस्कृती आणि तिची विविधता ओवैसी यांना डॉ. आंबेडकरांपेक्षा जास्त समजते का? या कायद्याला विरोध करणारे देशाचे तर नुकसान करीत आहेतच; पण मुस्लिम समाजाचे अतोनात नुकसान करीत आहेत. शाहबानो यांना तलाकानंतर हक्काची पोटगी मिळण्यापासून वंचित करेपर्यंत देशातील जातीयवाद्यांची मजल गेली. तसे पुन्हा कदापि होता कामा नये.

समान नागरी कायद्याने नेमके काय होणार आहे? आज देशात गुन्हेगारी कायदे सर्वांना समान आहेत. ‘नागरी’ कायद्यामुळे विवाह, घटस्फोट, वारसा, संपत्तीचे हक्क, दत्तक या गोष्टी सर्वांसाठी समान नियमांकित होतील. आज गोवा हे एकमेव राज्य ‘समान नागरी कायदा’ राबवते. तेथे सर्व धर्मांचे नागरिक आहेत. तेथे विविधतेला किंवा सामाजिक सलोख्याला गेल्या सहा दशकांत काय धक्का लागला? पोर्तुगीज राज्यकर्त्यांनी सन १८६७ पहिला नागरी कायदा (सिव्हिल कोड) आणला. तो सर्व धर्मियांना लागू होता. आजचा कायदा हा त्याच कायद्याचा आधुनिक अवतार आहे. एरवी देश लुटणाऱ्या परकीय राज्यकर्त्यांना जी किमान अक्कलहुशारी होती; तीही आपल्याला दाखवता येत नसेल तर स्वातंत्र्याला आणि राज्यघटनेतील समानतेच्या मूलभूत मूल्याला काय अर्थ राहिला? स्वातंत्र्यानंतर सार्वकालिक देशहिताची चर्चा आपण कायमच जात, पात, प्रांत, धर्म यांच्या निकषांनी चिरफाळून टाकली आहे. त्यामुळे, देशातील वैचारिक बृहद्‌चर्चा गेल्या काही दशकांत एका आवर्तात सापडली आहे. तिला वस्तुनिष्ठता, आधुनिकता, वैज्ञानिक दृष्टी आणि लोकहित यांच्यापेक्षा कोत्या पूर्वग्रहांचे कुंपण पडले आहे. या कायद्यावरील चर्चा तरी आता अशी कुंपणे ओलांडून व्हायला हवी. ‘जे अल्पसंख्यांक समान नागरिकत्व नाकारतात, त्यांना एक दिवस दुय्यम नागरिकत्व स्वीकारावे लागते. तेव्हा कधीतरी ‘वरिष्ठ नागरिकत्व’ मिळेल या भ्रमात न राहता समान नागरिकत्व स्वीकारणे योग्य,’ अशा शब्दांत ज्येष्ठ विचारवंत दिवंगत नरहर कुरुंदकर यांनी भलती स्वप्ने पाहणाऱ्यांना फटकावले होते. हा प्रस्तावित समान नागरी कायदा हिंदू धर्मातील प्रागतिक, आधुनिक विचारांनाही बळकटी देणार आहे. तो झाल्यावर ते स्पष्टपणे दिसेलच. या प्रश्नाला धार्मिक रंग येऊ न देता केंद्र सरकारने आता वेगाने पावले टाकावीत. या कायद्याला अपशकुन न करण्याइतके शहाणपण सर्वांना आले तर ठीकच आहे. नाही आले तर त्यांचा विरोध मोडून हा कायदा व्हायला हवा.

## संपादकीय »

### संशोधन संस्कृती रुजेल?

***देशातील विद्यापीठांमधील संशोधनाला पुरेसा निधी देण्यासाठी ‘नॅशनल रिसर्च फाउंडेशन’च्या (एनआरएफ) स्थापनेला मंजुरी देऊन केंद्र सरकारने ‘संशोधन संस्कृती’ रुजविण्यासाठी पुढचे पाऊल टाकले आहे.***

या विधेयकाला संसदेची मान्यता मिळून ‘एनआरएफ’ची विधिवत स्थापना होणे आणि जाहीर केल्यानुसार ५० हजार कोटी रुपये या संशोधन प्रतिष्ठानाला मिळणे हे पुढचे टप्पे आहेत. ते किती जलद पार पाडले जातात हे पाहावे लागेल. बहुतेक देशांत विद्यापीठांत संशोधन मोठ्या प्रमाणावर होते; आपल्याकडे ते कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे स्वातंत्र्यानंतर ‘वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदे’च्या (सीएसआयआर) राष्ट्रीय प्रयोगशाळा स्थापण्यात आल्या.

ख्यातनाम शास्त्रज्ञांकडून शिकण्याची आणि त्यांच्याबरोबर संशोधन करण्याची संधी यामुळे गेली. परिणामी विद्यापीठातील संशोधन कमी होत गेले. ते वाढावे यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले गेले. पुण्यासह देशात सात ठिकाणी सुरू करण्यात आलेली ‘आयसर’ ही संस्था या प्रयत्नांचाच एक भाग.

**भारतात प्रत्येक नागरिकासाठी समान नागरी कायदा असावा, असे प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताचे एक स्वप्नच अधोरेखित केले आहे.**


## वारी, वारसा आणि वर्षपूर्ती!

तत्कालीन मंत्री एकनाथ शिंदे यांनी बंड करून भाजपसोबत महायुतीच्या सरकारची महाराष्ट्रात स्थापना केली. आज या सरकारची वर्षपूर्ती! कालच राज्यभरात आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. या दोन महत्त्वाच्या घटनांची सांगड घालून खासदार राहुल रमेश शेवाळे यांनी मांडलेले विचार...

३० जून २०२२! हिंदुत्वासाठी तत्कालीन शिवसेना नेते एकनाथजी शिंदे यांनी पुकारलेल्या बंडाची अखेर सकारात्मक सांगता झाली आणि वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न सत्यात उतरलं. एक वर्तुळ नियतीने पूर्ण केलं. कोणतंही संसदीय पद भूषवणार नाही, अशी भीष्मप्रतिज्ञा बाळासाहेबांनी घेतली होती. एकनाथजी शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि 'सामान्य शिवसैनिक मुख्यमंत्री पदावर विराजमान व्हावा', हे बाळासाहेबांचं स्वप्न सत्यात उतरलं. आज त्याला एक वर्ष पूर्ण होतंय. हे स्वप्न साकार करण्यासाठी मीदेखील कटू वाटावा असा, पण कठोर आणि योग्य निर्णय घेतला, याचा आजही मला अभिमान वाटतोय.

वंदनीय हिंदुहृदयसम्राटांच्या आशीर्वादाने आणि माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमितजी शहा यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात सत्तेवर आलेल्या महायुतीच्या सरकारने गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वाचे आणि सामान्य जनतेच्या जीवनावर दूरगामी परिणाम करणारे सकारात्मक निर्णय घेऊन खऱ्या अर्थाने मोठ्या साहेबांचं स्वप्न पूर्ण केलं. कोविडचं कारण पुढे करून अनेक



महिने सामान्य जनतेला मंत्रालयात प्रवेश नाकारला जात होता. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात दाखल होणाऱ्या प्रत्येक नागरिकाचं म्हणणं ऐकून घेण्याची व्यवस्था केली. यामुळे तब्बल अडीच वर्षांनी मंत्रालयात जनतेचा थेट आवाज ऐकला जाऊ लागला. सर्व जिल्ह्यांत मुख्यमंत्री सचिवालय सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला. ई फायलिंग यंत्रणा, सेंट्रल रजिस्ट्री, विविध सरकारी विभागांमध्ये ७५ हजारांहून अधिक पदांची भरती प्रक्रिया, राज्य सेवा हक्क हमी कायद्याची कठोर अंमलबजावणी यांसारखे निर्णय घेऊन सरकार अधिकाधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. १३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५० हजारांची प्रोत्साहनपर रक्कम, १० लाख शेतकऱ्यांच्या वीजपंपांना सौरऊर्जा, शेतीला २४ तास वीज देण्यासाठी आराखडा आणि सततच्या अवकाळी पावसामुळे, नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई अशा अनेक निर्णयांमुळे राज्यातील बळीराजा सुखावला.


## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# समृद्धीमार्गावर 25 प्रवासी ठार

## बसला अपघात आणि आग : मृतदेहाची ओळख पटवणेही झाले कठीण

। नागपूर ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**बुलढाण्यात समृद्धी महामार्गावर प्रवासी बसचा भीषण अपघात होऊन २५ प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. या बसने पेट घेतल्याने या प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. समृद्धी महामार्गावरुन ही बस नागपूरहून पुण्याच्या दिशेने चालली होती. त्यावेळी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावाजवळ हा अपघात झाला. रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. या बसमध्ये ३२ प्रवासी बसले होते. त्यापैकी २५ प्रवाशांचा मृत्यू झाला. जखमी प्रवाशांना बुलढाणा येथील सरकारी रुग्णालयात उपचारांसाठी हलवण्यात आलं आहे.**

नेमकं काय घडलं?


प्रवासी बस नागपूरहून पुण्याच्या दिशेने चालली होती. रात्री दीड वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला आहे. या बसमध्ये नागपूर, वर्धा आणि यवतमाळ येथील प्रवासी होती. विदर्भ ट्रॅव्हल्सची ही बस होती. बस सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावाजवळ समृद्धी महामार्गावर रस्त्याच्या दुभाजकाला धडकली आणि बसने पेट घेतला. या घटनेत २५ प्रवाशांचा मृत्यू झाला.

### ...त्यामुळे कुणालाही बाहेर येता आले नाही

बस आधी लोखंडी पोलला धडकून नंतर रस्ता दुभाजकाला धडकली. बस उलटून बसचा दरवाजा गाडीखाली आल्याने कुणालाही बाहेर येता आलं नाही. वाचलेले काही प्रवासी काचा फोडून बाहेर आले अशीही माहिती मिळते आहे. अपघातानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर डिझेल सांडले आहे. बसने पेट घेतल्याने मृतदेह होरपळले आहेत. त्यांची ओळख पटवणंही कठीण झालं आहे अशीही माहिती समोर आली आहे.स आधी लोखंडी पोलला धडकून नंतर रस्ता दुभाजकाला धडकली. बस उलटून बसचा दरवाजा गाडीखाली आल्याने कुणालाही बाहेर येता आलं नाही. वाचलेले काही प्रवासी काचा फोडून बाहेर आले अशीही माहिती मिळते आहे.

विदर्भ ट्रॅव्हल्सची MH 29 BE – 1819 क्रमांकाची ही बस नागपूरहून पुण्याकडे जात होती. ३० जूनला नागपूरहून संध्याकाळी ५ वाजता पुण्यासाठी ही बस निघाली होती. १ जुलै च्या रात्री १.२२ मिनिटांनी धावत्या गाडीचे समोरील टायर अचानक निघाल्याने ट्रॅव्हल्स समृद्धी महामार्गावरील पुलावरील दुभाजकाला धडकून पलटी झाली. त्यानंतर काही मिनिटामध्ये पेट घेतल्यानंतर गाडीचा स्फोट होऊन ही खासगी प्रवासी बस पेटली आणि हा अपघात झाला.

# मुंबईत आजपासून १० टक्के पाणीकपात, धरणांमध्ये १०.८८ टक्के जलसाठा



।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणक्षेत्रात मुसळधार पाऊस कोसळत असून धरणांतील पाणीसाठ्यात चांगलीच वाढ झाली आहे. मात्र असे असले तरी महापालिकेने जाहीर केलेली १० टक्के पाणीकपात शनिवार, १ जुलैपासून लागू होणार आहे. दरम्यान, पावसाच्या संततधारेमुळे मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील जलसाठ्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे.**

दमदार पावसामुळे सर्व धरणांतील पाण्याच्या पातळीत वाढ होऊ लागली आहे. असे असताना मुंबईत १ जुलैपासून पाणीकपात लागू करण्यात येत आहे. धरणांमधील पाणीसाठा खालावल्यामुळे महापालिकेने १० टक्के पाणीकपात करण्याचा निर्णय जूनच्या शेवटच्या आठवड्यात घेतला होता. चांगल्या पावसामुळे धरणांमधील सहा टक्क्यांपर्यंत खालावलेला पाणीसाठा शुक्रवारी १०.८८ टक्के झाला आहे.

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वैतरणा, मोडक सागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, तुळशी या सातही धरणांत सध्या एक लाख ५७ हजार ४१२ दशलक्ष लिटर पाणीसाठा आहे. गेल्या चार दिवसांतील पावसामुळे पाणीसाठ्यात वाढ झाली असून गेल्या वर्षीपेक्षा पाणीसाठा वाढला आहे.

# एपीएमसीत कांदा वधारला!

## प्रतिकिलो 3-5 रुपयांची वाढ : गृहिणींच्या डोळ्यांत पाणी



। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात जुलै महिन्यात सरासरीएवढा मोसमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यास ७ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने शुक्रवारी वर्तवला. ''यंदा देशात मोसमी पाऊस उशिराने दाखल झाला.**

मोसमी वाऱ्यात फारसा जोर नव्हता. पण, बिपरजॉय चक्रीवादळीमुळे मोसमी वारे वेगाने देशभरात पोहोचले. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टी, दक्षिण भारत, ईशान्य भारतात जूनच्या शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस झाला आहे. तरीही किनारपट्टीवर पडलेला पाऊस जून महिन्याच्या सरासरीपेक्षा कमीच आहे. सध्या सुरू असलेल्या पावसाचा जोर दोन दिवसांत कमी होईल. त्यानंतर बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन पावसाला पोषक स्थिती तयार होईल. साधारण ७ जुलैनंतर पावसाचा जोर वाढण्याची अपेक्षा आहे, असे भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले.

दरम्यान, मुंबई आणि उपनगरासह नवी मुंबई, ठाणे परिसरात शुक्रवारी जोरदार पावसाची नोंद झाली.

### पाच दिवस मुसळधारांचा अंदाज

**महाराष्ट्रापासून केरळ किनारपट्टीपर्यंत तयार झालेला कमी दाबाचा पट्टा कायम आहे. त्यामुळे पुढील तीन दिवस कोकण आणि गोव्याला 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. पुढील पाच दिवस किनारपट्टीवरील अन्य जिल्ह्यांत मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. घाटमाथा, मध्य महाराष्ट्रातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाड्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.**

# राम चरणच्या लेकीचं थाटात बारसं

दाक्षिणात्य सुपरस्टार आणि आरआरआर फेम राम चरण काही दिवसांपूर्वीच बाबा झाला. राम चरणची पत्नी उपासना कमिनेनी २० जूनला एका गोंडस मुलीला जन्म दिला. त्यामुळे सध्या त्या दोघांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तर आज त्यांच्या लेकीचं बारसं संपन्न झालं. त्यांच्या मुलीच्या नावाने आता सर्वांचं लक्ष वेधलं आहे.

मुलीला जन्म दिल्यानंतर चार दिवसांनी रामचरण च्या पत्नीला डिस्चार्ज देण्यात आला. त्यादरम्यानचा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप वायरल होत होता. लेकीला घरी आणल्यानंतर गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या घरी बारशाची जय्यत तयारी सुरू होती. त्याबद्दलचे अपडेट्स उपासना सोशल मीडिया वरून शेअर करत होती. तेव्हापासून चाहत्यांमध्ये ते दोघं त्यांच्या मुलीचं नाव काय ठेवणार याची उत्सुकता होती.



राम चरणच्या लेकीचं बारसं झालं. राम चरण आणि उपासनाने या बारशाचे काही फोटो सोशल मीडिया वरून शेअर केले. हे बारसं अत्यंत पारंपारिक पद्धतीने पार पडलं. यावेळी राम चरणने ऑफ वाईट रंगाचा झब्बा कुर्ता आणि त्यावर पांढऱ्या रंगाचा सोनेरी काठ असलेलं उपरणं घेतलं होतं. तर उपासनानेही ऑफ वाईट रंगाची साडी नेसली होती. याचबरोबर घरातील इतर मंडळींनी ऑफ वाईट रंगाचे कपडे परिधान केले होते. अत्यंत थाटामाटात हे बारसं पार पडलं. त्यांनी त्यांच्या लेकीचं नाव ‘क्लिन कारा कोनिडेला’ असं ठेवलं आहे.

या नावाबद्दलची एक पोस्ट शेअर करत राम चरण आणि उपासनाने लेकीचं नाव तर जाहीर केलंच पण त्याचबरोबर या नावाचा अर्थही सांगितला. या नावाचा अर्थ खूप खास आहे. या नावाचा अर्थ आध्यात्मिक जागृती करणाऱ्या उर्जेचं प्रतिक..असा होतो. तर आता नेटकरी त्यांच्या पोस्टवर प्रतिक्रिया देत हे नाव आवडल्याचं सांगत लेकीला, राम चरण आणि त्याच्या कुटुंबीयांना शुभेच्छा देत आहेत.




# हीच खरी अप्सरा... सोनालीचा नवा लूक पाहून चाहत्यांनी केलं कौतुक



अभिनेत्री सारा अली खान सध्या तिच्या ‘जरा हटके जरा बचके’ चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. २ जूनला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने आतापर्यंत जगभरात १०० कोटींहून अधिक कमाई केली आहे. अलीकडेच दिलेल्या एका मुलाखतीत अभिनेत्री सारा अली खानने चित्रपटाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनबाबत आनंद व्यक्त करत, आई अमृता सिंहबद्दल काही खुलासे केले आहेत.

दरम्यान, ‘जरा हटके जरा बचके’ चित्रपटाद्वारे पहिल्यांदाच विकी कौशल आणि सारा अली खान यांची ऑनस्क्रीन जोडी प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. विकी-साराशिवाय चित्रपटात इनामुलहक, नीरज सूद, राकेश बेदी, शारीब हाश्मी, सुष्मिता मुखर्जी यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. चित्रपटाची कथा इंदूरमधील मध्यमवर्गीय जोडप्यावर आधारित असून याचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले आहे.




# ‘3 इडियट्स’चा दुसरा भाग लवकरच येणार... प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला

२००९ साली ‘३ इडियट्स’ हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि त्याने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घातला. या चित्रपटाला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलं. या चित्रपटातली गाणी संवाद चित्रपटाची कथा हे सर्वच सुपरहिट ठरलं. प्रेक्षक आता ‘३ इडियट्स’ च्या दुसरा भागाची आतुरतेने वाट पाहत आहे. आता चित्रपटात राजूची भूमिका साकारणाऱ्या शर्मन जोशीने या चित्रपटाच्या सीक्वलबाबत मोठी हिंट दिली आहे.

डीएनएशी बोलताना शर्मन जोशीने ‘३ इडियट्स’च्या दुसऱ्या भागाबद्दल भाष्य केलं आहे. शर्मन म्हणाला ”या चित्रपटाचा सिक्वेल बनवण्यासाठी राजू सर खूप उत्सुक आहे. सध्या ते चित्रपटाच्या कथेवर काम करत आहे. तुम्ही काळजी करू नका, जेव्हा चित्रपटाची कथा पूर्ण होईल तेव्हा आम्ही त्या कथेवर काम करू.”

# केतकी चितळेच्या आयुष्यावर लवकरच प्रकाशित होणार पुस्तक



अभिनेत्री केतकी चितळे वादग्रस्त वक्तव्यामुळे नेहमीच चर्चेत असते. ती सोशल मीडियावर अधिक सक्रीय असून तिथे ती प्रत्येक मुद्द्यावर आपली मत मांडत असते. गेल्यावर्षी केतकी एका आक्षेपार्ह पोस्टमुळे अडचणीत सापडली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याबाबत तिनं पोस्ट केली होती. या आक्षेपार्ह पोस्टमुळे तिला ४१ दिवस तुरुंगवास भोगावा लागला होता. आता याच तुरुंगवासाच्या प्रवासावर केतकी चितळेनं एक पुस्तक लिहिलं आहे. केतकीचं हे पुस्तक पुढच्या वर्षी प्रकाशित होणार आहे. याबाबतची माहिती तिनं स्वतः इन्स्टाग्राम लाईव्हच्या माध्यमातून चाहत्यांना दिली आहे.

केतकीनं वेगवेगळ्या मुद्द्यांविषयी बोलण्यासाठी इन्स्टाग्राम लाईव्ह केलं होत. यामध्ये मतदान ओळखपत्रासाठी नोंदणी करा, मतदान करा. युसीसीबाबत तुमचं मत मांडा. एपिलेप्सी कम्युनिटीमध्ये असलेला आकाश दीक्षित हा कशाप्रकारे फसवणूक करत आहे, अशा अनेक मुद्द्यांवर केतकी इन्स्टाग्रामवर लाईव्हवर बोलत होती. याच वेळी तिनं एका चाहत्याला उत्तर देताना पुढच्या वर्षीय आपल्या आयुष्यावर आधारित पुस्तक प्रकाशित होणार असल्याचं सांगितलं.

एका चाहत्यानं तिला विचारलं होतं की, “तुमची स्टोरी?” यावर उत्तर देताना केतकी म्हणाली की, “पुढच्या वर्षी माझं पुस्तक प्रकाशित होतंय. तर जरूर विकतं घ्या. तुम्हाला माझं संपूर्ण आयुष्य नाही, पण तुरुंगात जायचा प्रवास आणि का? याच्या मागील कारण कळेलं. पुढच्या वर्षी ते पुस्तक प्रकाशित होतंय. माझ्याबाबतीत नेमकं काय घडलं होतं? यावर पुस्तकात लिहिण्यात आलेलं आहे. कृपया, जेव्हा पुस्तक प्रकाशित होईल तेव्हा जरूर विकतं घ्या.”

# नीरज चोप्राने पुन्हा रचला इतिहास

## भारतवासीयांना अभिमान: 87.66 मीटर अंतरावर भालाफेक करत मिळवलं पहिलं स्थान

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राची सुवर्ण कामगिरी आपल्या सगळ्यांच्या स्मरणात आहेच. याच नीरज चोप्राने देशाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा खोवला आहे. नीरज चोप्राने लॉसने डायमंड लीग (LAUSANNE DIMOND LEAGUE) मध्ये पहिलं स्थान पटकावलं आहे. ८७.६६ मीटर अंतरावर भाला फेक करत त्याने हे स्थान मिळवलं. सिझनमधला हा त्याचा दुसरा विजय आहे. याआधी दोहा डायमंड लीगमध्ये ८८.६७ मीटर भालाफेक करत नीरजने पहिलं स्थान मिळवलं होतं.**




नीरज चोप्राने ५ मे रोजी दोहा डायमंड लीगमध्ये भाग घेतला होता. त्यानंतर आता लॉसने डायमंड लीगमध्ये त्याने पहिलं स्थान पटकावलं आहे. या महिन्याच्या सुरुवातीला एफबीके गेम्स आणि पावो नूरमी गेम्स या दोन्ही स्पर्धांमधून नीरज चोप्राने दुखापत झाल्यामुळे माघार घेतली होती.

नीरज चोप्राने या लीगच्या पाचव्या फेरीत ८७.६६ मीटर अंतरावर भाला फेकला आणि विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. या फेरीत त्याने फाऊलने सुरुवात केली होती. मात्र त्यानंतर ८३.५२ मीटर आणि ८५.०४ मीटरवर त्याने भाला फेकला. चौथ्या फेरीत नीरजकडून आणखी एक फाऊल झाला. पण पुढच्या म्हणजे पाचव्या फेरीत ८७.६६ मीटर अंतरावर नीरजने भाला फेकला. त्याची बरोबरी कुणीही करु शकलं नाही. त्यामुळे नीरजने डायमंड लीग पुरस्कारावर आपलं नाव कोरलं आहे.

### नीरज चोप्राने काय म्हटलं ?

२०२३ या वर्षात आपल्याला भालाफेक स्पर्धेत ९० मीटरचा टप्पा ओलांडायचा आहे असं त्याने सांगितलं होतं. मात्र यासाठी कुठलाही दबाव आपल्यावर नाही असंही तो म्हणाला होता. नीरजची आत्तापर्यंतची उत्कृष्ट कामगिरी ८९.९४ मीटर इतकी आहे. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देत नीरजनं इतिहास रचला होता. भालाफेकमध्ये सुवर्ण जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला आहे. या यशानंतर नीरजचा अद्भुत प्रवास सुरू आहे.



# भारताचीच मक्तेदारी; नऊ पर्वात आठव्यांदा आशियाई कबड्डी स्पर्धेचे जेतेपद

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय संघाने कबड्डीतील मक्तेदारी पुन्हा एकदा सिद्ध करताना आशियाई अजिंक्यपद स्पर्धेचे जेतेपद पटकावले. कोरियातील बुसान येथे झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शुक्रवारी भारतीय पुरुष संघाने कडवी झुंज देणाऱ्या इराणला ४२-३२ अशा फरकाने पराभूत केले. भारताने नऊ पर्वात आठव्यांदा ही स्पर्धा जिंकली.भारतीय संघाने या स्पर्धेत वर्चस्वपूर्ण कामगिरी करताना आपले पाचही साखळी सामने जिंकत अंतिम फेरी गाठली आणि अंतिम फेरीत इराणचे आव्हान परतवून लावले.**



अंतिम लढतीत भारताने दमदार सुरुवात केली. दहाव्या मिनिटाला भारताने इराणवर लोण दिला. कर्णधार पवन सेहरावतने खोलवर चढाई करताना इराणच्या दोन खेळाडूंना बाद करत भारताला १०-४ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आणखी एक लोण चढवताना भारताने मध्यंतरापर्यंत आघाडी २३-११ अशी वाढवली.

उत्तरार्धात अपेक्षेप्रमाणे इराणने खेळ उंचावला. मात्र, भारतानेही वेगवान खेळ सुरू ठेवताना पुन्हा इराणवर लोण देत ३३-१४ अशी आघाडी भक्कम केली. यानंतर मात्र इराणने पुनरागमन केले. दोन मिनिटे शिल्लक असताना इराणने भारताची आघाडी ३८-३१ अशी कमी केली. त्या वेळी केवळ अस्लम इनामदार मॅटवर शिल्लक होता. परंतु इराणचा कर्णधार मोहम्मदरेझा शाबलोउई चियानेला अस्लमला बाद करण्यात अपयश आल्याने भारताला ‘सुपर टॅकल’चे तीन गुण मिळाले. त्यामुळे भारताचा विजय सुनिश्चित झाला.

**सहा संघांचा सहभाग**

आशियाई अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत भारतासह इराण, जपान, कोरिया, चायनीज तैपेई आणि हाँगकाँग या संघांचा सहभाग होता. भारताने या स्पर्धेतील सर्वात मोठा विजय कोरियाविरुद्ध ७६-१३ असा मिळवला. तर साखळी सामना आणि अंतिम सामन्यात इराणने भारताला कडवी झुंज दिली.

**आशियाई क्रीडा स्पर्धेकडे लक्ष**

भारतीय कबड्डी संघ आता सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये चीनमधील हांगझो येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदवेल. २०१८ साली जकार्ता येथे झालेल्या स्पर्धेच्या गेल्या पर्वात भारताला उपांत्य फेरीत इराणकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे यंदा त्या पराभवाची परतफेड करतानाच सुवर्णपदक जिंकण्याचे भारताचे लक्ष्य असेल.

# रहाणेला पुन्हा उपकर्णधारपद का? माजी कर्णधार गांगुलीची भारताच्या संघनिवड प्रक्रियेवर टीका

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**जवळपास दीड वर्ष संघाबाहेर राहिल्यानंतर अजिंक्य रहाणेची पुन्हा भारतीय कसोटी संघाच्या उपकर्णधारपदी निवड होणे, ही बाब माजी कर्णधार आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा (बीसीसीआय) माजी अध्यक्ष सौरव गांगुलीला फारशी पटलेली नाही. भारतीय संघाच्या निवडप्रक्रियेत सातत्याचा अभाव असल्याची गांगुलीने टीका केली आहे.**

३५ वर्षीय रहाणेने जवळपास १८ महिन्यांनंतर भारतीय संघात पुनरागमन करताना जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम लढतीत चांगली कामगिरी केली. या महिन्याच्या सुरुवातीला ओव्हल येथे झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात त्याने ८९ आणि ४६ धावा केल्या होत्या.

पुनरागमनात केवळ एक सामना खेळल्यानंतर रहाणेची आगामी वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी भारतीय संघाच्या उपकर्णधारपदी निवड करण्यात आली. रहाणेने यापूर्वी सहा कसोटी सामन्यांत भारताचे नेतृत्व केले आहे.

त्याच्या नेतृत्वाखाली भारताने ऑस्ट्रेलियात कसोटी मालिकाही जिंकली होती. मात्र, आता रहाणेला पुन्हा उपकर्णधारपद देण्यापेक्षा कसोटी संघातील स्थान निश्चित असलेल्या अन्य एखाद्या खेळाडूला ही जबाबदारी देणे योग्य ठरले असते असे गांगुलीला वाटते.

“तुम्ही १८ महिने संघाबाहेर असता, त्यानंतर पुनरागमन करता, एक सामना खेळता आणि तुमची थेट उपकर्णधारपदी निवड होते. संघनिवडीची ही प्रक्रिया मला समजलेली नाही. तुमच्याकडे रवींद्र जडेजासारखा खेळाडू आहे, जो बऱ्याच वर्षांपासून सर्वोच्च स्तरावर खेळत असून त्याचे कसोटी संघातील स्थान पक्के आहे. त्याचा उपकर्णधारपदासाठी का विचार केला जात नाही? एखाद्या खेळाडूला पुनरागमनानंतर त्वरित उपकर्णधारपद देणे, ही बाब मला पटत नाही. संघनिवडीत सातत्य गरजेचे आहे,” असे गांगुलीने नमूद केले.



### सर्फराजला संधी गरजेची

मुंबईकर फलंदाज सर्फराज खानला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:ला सिद्ध करण्याची संधी मिळाली पाहिजे, असे गांगुलीला वाटते. “मला सर्फराजसाठी नक्कीच वाईट वाटते. त्याने गेल्या तीन वर्षांत रणजी करंडकात केलेली कामगिरी पाहता त्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळाली पाहिजे. सर्फराज वेगवान गोलंदाजांविरुद्ध अडचणीत सापडतो असे म्हटले जाते. मात्र, तसे असते तर त्याला भारतात विविध खेळपट्ट्यांवर इतक्या धावा करताच आल्या नसत्या,” असे गांगुली म्हणाला.